Pre-Pri

ई- साहित्य प्रकाशन २९ एप्रिल २००९ (अंक २३ )

# चैत्रचाफा

संपादकीय -

चैत्र आणि चाफ्याचं जणू काही अबोल नातं असाव.
चैत्र आला की चाफा फुलतो, विविधरंगी सुगंधी फुलं मन
मोहून टाकतात, चाफ्याच्या मोहमयी जादूतून सुटेल असा
कोणी विरळाचं. ज्याच वर्णन प्रत्यक्ष ज्ञानेश्वर माऊलींनी
'अमृताचा पुतळा' असं केलय त्या चाफ्याची थोरवी अधिक
काय वर्णावी ?
अशा चैतन्यमयी चैत्रात आम्ही घेऊन आलोय
चाफ्यासारख्या सुगंधी कविता
ज्यांचा सुगंध तुमच्या मनात सतत दरवळत राहिल.
सुंदर रंगांची पखरण करीत राहिल.

*या अंकात वाचा –*

- *सुगंधी रंगीबेरंगी कविता*


संपादक

*सोनाली घाटपांडे ( पुणे )*

अतिथी संपादक

*सनिल पांगे (मुंबई)*

सह संपादक

*स्वप्ना कोल्हे ( नाशिक )*
*अहं ब्रह्मास्मी ( पुणे )*
*रेणूका रेपाळ (अमेरिका )*
*सुरुची नाईक ( नागपूर )*
*आनंद माने ( सोलापूर )*
*नाम गुम जायेगा ( ठाणे )*
*सचिन काकडे ( मुंबई )*
*सारंग भणगे ( पुणे )*

## ती आणि पाऊस

मला पहायचय तिला एकदा पावसात भिजताना
सरसरणा-या सरींमध्ये ओलीचिंब होताना

पहिल्या वहिल्या पावसात
ती नाच नाच नाचेल
चेहे-यावरच हास्य तिच्या
आणखी खुलून उठेल
पाऊस सुध्दा वेडा होईल
तिला ओली करताना,
मला पहायचय तिला एकदा पावसात भिजताना

भिजता भिजता हळूच
ती केस मोकळे सोडेल
डोळयावरची ओली बट
हळूच मागे सारेल
उर्वशीही लाजेल बिचारी
तिच रूप बघताना,
मला पहायचय तिला एकदा पावसात भिजताना

भिजता भिजता कदाचित
ती माझी आठवण काढेल
बरसणा-या पावसालाही
मग माझा हेवा वाटेल
पण खर मला आठवेल का ती?
अस काही घडताना
मला पहायचय तिला एकदा पावसात भिजताना

पावसाळा चालू झाला की
तिचेच विचार मनात येतात
नकळत माझे डोळे
उगाचच पाणावतात
पण, माझ्या भावना कळतात का तिला ?
मी तिच्या आठवणीत भिजताना
मला पहायचय तिला एकदा पावसात भिजताना

कधीतरी पावसात ती
माझ्या सोबत असेल
तिच्या प्रेमात आणि
ती पावसात भिजेल
पूर्ण होईल का माझं स्वप्न मी या जगात असताना
मला पहायचय तिला एकदा पावसात भिजताना

- उमेश खिल्लारे

## माझ्या कोकणच्या मातीचा

माझ्या कोकणच्या मातीचा
गंधच वेगळा
उर भरून जीवनाचा श्वास
असा रम्य सोहळा


तांबड्यामातीचा गेरू
चार क्षितीजे दूर विखुरलेला
त्यावर परशूने चौफेर रंग
मनमुराद उधळलेला

गगन भेदी सह्याद्री रक्षिती
ल्यावून हिरवा साज
नजर वाहेल तिथे उभे पहाड
तर कुठे खोल दरीचा भास

मातीच्या ओढ़ाने झेपावती
फेसाळ जलतुषार मधुर
मातीलाच बिलगून वाहते
सरिता सागर भेटीला आतूर

अळवावरचा प्रभातबिंदू नटावा
तसा माणसात ओलावा दाटावा
निसर्गही दिधतो साभार कोकणचा मेवा
सदैव पाहुणचाराला आतुर कधीही येवा

- परमानंद सावंत



**एक आनंदी पक्षी मी**

एक आनंदी पक्षी मी
उडतो आहे एकटाच नभी

स्वच्छंदी आणि उनाड मी
भाव मनाचे मांडतो गाण्यातूनी

गंभीर आणि उदात्त मी
बघतो या जगाला नभातूनी

धुंद आणि बंधमुक्त मी
झोका खेळतो या फांदीहूनी त्या फांदीवरी

धीट आणि साहसी मी
झुंजतो आहे एकटाच या जीवनाशी

मित्र आणि सहवासी मी
सोबत चालतो हासत हासत या आयुष्याशी

एक आनंदी पक्षी मी
उडतो आहे एकटाच नभी

- नीरज रेणू पाचपोर

**!! हिरवा कोंब !!**

पान्हारून आले
आषाढाचे घन
तान्हावले मन
देहदेठी

आमाळून गेले
आशेचे पालव
कोमाळले आसव
सर्गमिठी

गेहीचे उमाळे
न पडो वोखटे
देहीचे खोपटे
आसासूस

हिरव्या कोंबाने
उजवली कूस
ग़ारव्याचे दिस
स्वप्नावले

- अरूण नंदन



## ~ ~ ~ सोहळा ~ ~ ~

आज सोहळा नभी रंगला ,

चंद्र कोवळा गहिवरला

टिपूर चांदणं

मधाळ भोवती ,

तो पाहून सागर मनी हसला,

मुग्ध चंद्रिका गवाक्षात अन

खग घरट्यातून फडफडला,

शांत निशाचर पांथस्थाच्या

उरात तीर जणू घुसला,


ती कळी पाकळी अन चाफ्याला

कशी कळावी ही अबला ?

मनामनांचे धागे जुळता

ती चाल लागली शब्दाला

\- रेखा जाधवर






## तुझ्या मनाचा प्राजक्त

दरवळ श्वासास माझ्या

आठव उदयता हृदयी

पापणीत भिजती तिन्हीसांजा

पुराणीच साथ रे आपूली

तरी नित्य तिची नवलाई

येई सामोरी जेव्हा

मन वसंत बहरूनी जाई

कळती मजलाही उसासे

तव श्वासास भारलेले

लयबध्द सुरावटी व्ररती

जणू ठेक्यास भारलेले

परि नाजूक रे, ते अनुबंध

श्वासास भार का होती

हृदयाची मापून खोली

अंतरीचा कब्जा घेती

\- सुमन परब

## वाटा

कोणास कधी कळतात वाटा
वेड्या कोठून कशा वळतात वाटा ।

एकाकी आयुष्य ठेऊन आठवांना
सोडून हात कधी पळतात वाटा ।

पाहीले मी सरणावर स्वप्न होते
जाळूनी स्वप्न अशा जळतात वाटा ।

पाहूनी त्या वळणावर आसवांना
काळोखाआड कधी गळतात वाटा ।

कोणी बोले दुनिया तर गोल आहे
फिरूनी गोल कुठे मिळतात वाटा ?

तीही सोडून मला वळणात गेली
तिच्यावाचून मला छळतात वाटा ।

हो येथेच सुरूवात, इथेच अंत
किती प्रवास असे गिळतात वाटा ।

- सुधीर मुळीक

## एक चिंचोळी नागमोडी वाट

एक चिंचोळी नागमोडी वाट
लागला पाट अन चढता घाट
मध्ये असतीलही खाचखळगे
पण फसगत नाही करणार

हातात धुरकटलेला कंदील
रातकिड्यांची ऊबवणारी साथ
फडफडला कितीही सांजदिवा
पण आडवाटेला नाही विझणार

वा-याची अनाम झपाटसंगत
सोबतीला काजव्यांची पंगत
घुसला कितीही आडवातिडवा
पण उभा फडात नाही चिरणार

हा दुर्दम्य मनाचा वितंडवाद
घळईमधून उपजणारा उन्माद
तुटला दोर फुटला घाटमाथा
एक पडला दुसरा नाही थांबणार

या प्रसवणा-या भयाण राती
भिववणा-या निपचित पडछाया
आळसावली पहाट अंमळ जरा
त्या मंगल उदयास नाही रोखणार

-भूपेश कुंभार



## मूर्ती

मूर्ती शाडूची
विरघळते पाण्याने
मूर्ती दगडाची
दुभंगते प्रहाराने ।।१।।

मूर्ती लाकडाची
पोखरते वाळवीने
मूर्ती काचेची
फुटते पतनाने ।।२।।

मूर्ती चांदीची
काळवंडते अम्लाने
मूर्ती सुवर्णाची
विताळते अग्नीने ।।३।।

मूर्तीला शाप
असतोच भंगण्याचा
तरी का हट्ट
युगानुयुगे पुजण्याचा ।।४।।

भंगते ती मूर्ती
का प्रतिमा तिची
विखुरल्या भागातही
प्रचिती देवत्वाची ।।५।।

- मेधा सकपाळ (नाखरे)

## योग

व्हावे थोडे प्रवाही
वातावरण गोठताना
माझे भाव मलाही
विनाकारण रोखताना

टोळ आला प्रश्नांचा
सांजकिरण लोपताना
खोल घाव उल्कांचा
देहावरण सोडताना

योग होई किनारा
भवसागर पोहताना
क्षोभ मिटे येणारा
गुरूचरण सेवताना

- निलेश सकपाळ

## मी ही प्रेम केलय

होय, मी ही प्रेम केलय,
तुझ्या त्या स्वभावावर,
पट्कन रूसण्यावर आणि,
रूसण्यानंतरच्या हास्यावर

होय, मी ही प्रेम केलय,
तुझ्या त्या रागवण्यावर,
चुकीबद्दल ओरडण्यावर,
आणि समंजसपणावर

होय, मी ही प्रेम केलय,
तुझ्या डोळ्यांवर,
त्यातील आशा आपेक्षांवर,
तुझ्या इच्छांवर

होय,
वाट पहातोय तुझ्या हो म्हणण्यावर
अजुनी तेव्हढ्याच एका आशेवर

- निलेश लोटणकर



## मायेची ज्योत

पंख लाभले आकाश मोकळे
घरट्याची ऊब किती दिस साहू

पंखात बळ आकाशाची आस
न विहरताच कसे बळ आजमावू

क्षणांचा दुरावा आठवांचा थवा
नयनी आसू आता नको थांबवू

जिद्द मनाची धग कर्तव्याची
स्वस्थ बसवेना कसा मी राहू

कुस तुझी आठवात साचलेली
माया तुझी कशी सांग मी विसरू

दूर घरटे मन वाहते तुझ्यापाशी
मायेची ज्योत राहूदे अखंड चालू

- अमित डांगे

## को-या कागदावर

को-या कागदावर रेखांच्या आडव्यातिडव्या वळणावर
असे अचानक शब्द काहीसे भेटले

त्यातले काही परिचयाचे
काही तर बीन ओळखीचे
बघुन मला स्मित ते हासले

काहीकाळ बसलो सोबत
आडवाटेवरची निराळीच गंमत
मैत्रीचे गोड नाते जुळून आले

आपसातली देव-घेव
सुरू होता न होता
एकाकीउदास मन रमू लागले

हाती कलम धरून
बसतो त्याच वाटेकडे एकटक लावून
कैआ सांगू वेड तयांनी लाविले

- चेतन फडणीस (नमस्कार)



रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन काव्य पुरविण्याचा ई-साहित्य प्रकाशनाचा ध्यास 'नेटाक्षरी' जोमाने पार पाडत आहे. दर आठवड्यात मिळणा-या तुमच्या प्रतिसादांनी आमचा उत्साह द्विगुणीत होतोय, नेटाक्षरी हा साप्ताहिक अंक सध्या सुमारे ३५००० मराठी रसिकांना विनामूल्य वितरीत केला जातो. त्याव्यतिरिक्त वेबसाईट्वर व्हिजिट करून वाचणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. हा अंक आपण आपल्या ईष्टमित्रांना फ़ॉरवर्ड करण्यास आमची काही हरकत नाही परंतू असे करताना आमच्या आयडीचा अंतर्भाव केल्यास आम्ही आभारी राहू . मराठी कवितेची लोकप्रियता वाढवण्यास आपला हातभार लागावा ही इच्छा. आपल्यासारख्या रसिकांच्या सहाय्याने हा अंक लवकरच एक लक्ष वाचकांपर्यंत नियमित पोहोचवण्याचा आमचा संकल्प सिद्धीस जाईल असा आम्हाला विश्वास आहे.

netaksharee@gmail.com

## *आतिथी संपादकाची ऑळख -*



*सानिल पांगे म्हणजेच 'सनिलदा', अतिशय मितभाषी व मृदू हृदयाचा सनिल दा ऑर्कूट परिवारात लाडका न झाल्यासच नवल. त्याचे 'प्रेम' , 'अधांतरी' , 'प्रिय मनास' आणि ' प्रेमाचा इंद्रधनू' हे चारोळी संग्रह प्रकाशित झाले आहेत, कोकणावर निस्सिम प्रेम करणा-या सनिलदा चे वर्णन करण्यासाठी त्याचीच एक कविता योग्य आहे.*

